पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण
पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003
दुरध्वनी नंबर 0253-2309700
E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


**प्रेस नोट** दिनांक : ११/१२/२०२४

# इगतपुरी पोलीस ठाणे हद्दीत परराज्यातुन आलेला, महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेल्या अवैध गुटख्यासह दिड कोटींचा मुद्देमाल जप्त
## नाशिक ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

---

महाराष्ट्र शासनाच्या अधिसुचनेनुसार मानवी आरोग्याच्या दृष्टीने गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखू तसेच मानवी आरोग्यास हानीकारक असणा-या खाद्यपदार्थांची विक्री, उत्पादन, साठवणुक, वाहतुक आदी व्यावसायांना प्रतिबंधीत करण्यात आलेले आहे. त्या पार्श्वभूमीवर नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांचे मार्गदर्शन व सूचनांप्रमाणे ग्रामीण पोलीसांची जिल्हाअंतर्गत गुटख्याची वाहतूक, विक्री, वितरण व साठवणूक करणा-यांविरूध्द कारवाई सुरू आहे.

दिनांक १०/१२/२०२४ रोजी सायंकाळचे सुमारास समृध्दी महामार्गाने मुंबई बाजूकडे काही संशयीत इसम मालवाहू ट्रकमध्ये गुटख्याची अवैधरित्या वाहतुक करून विक्री करण्याचे उद्देशाने जाणार असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांना मिळाली होती. सदर बातमीप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने नांदगाव सदो शिवारात समृध्दी महामार्गाचे एक्झीट टोल परिसरात छापा टाकून, टाटा कंपनीचा ट्रक क्रमांक आर.जे.११.जी.सी.००९१ यामध्ये अवैधरित्या गुटख्याची वाहतुक करणारा इसम नामे **१) अरमान शोहराब खान,** वय २०, रा. फिरोजपुर डेहेर, ता. नगीना, जि.नुह मेवात, राज्य हरियाणा यास ताब्यात घेतले. सदर इसम हा फुटवेअर कंपनी व प्लॅस्टिक टॉयज् कपंनीचे नावाचे बनावट बिल तयार करून चोरटया रितीने गुटख्याची वाहतुक करतांना मिळून आला असून त्याचे कब्जातून एस.एच.के., आर. रॉयल १०००, आशिकी, सुपरकॅश गोल्ड, व्ही.सी.५, डी.बी.सिग्नेचर कंपनीचे नावांचे सुगंधीत गुटख्याचा **१,१८,४४,०००/- रूपये किंमतीचा अवैध गुटखा**, टाटा कंपनीची ट्रक क्रमांक आर.जे.११.जी.सी.००९१ व इतर साहित्य साधने असा एकुण १,५३,५४,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यातील ताब्यात घेतलेला इसम हा महाराष्ट्र राज्यात उत्पादन, साठा व साठयास प्रतिबंधीत असलेला गुटखा, सुगंधीत/स्वादीष्ट तंबाखू, पानमसाला, सुगंधीत स्वादीष्ट सुपारी व तत्सम गुंगीकारक पदार्थ मानवी शरीरास सेवन करण्यास अपायकारक आहे, हे माहिती असतांना देखील स्वत:चे फायद्यासाठी अवैधरित्या गुटखा विक्री करण्याचे उद्देशाने कब्जात बाळगातांना मिळून आले असून त्याचेविरुध्द **इगतपुरी पोलीस ठाणेस गुरनं २७६/२०२४** भा.न्या.सं. कलम १२३, ३१८(४), ३३६(१), ३३६(३), ३४०(२), २७५, २७४, २२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात आरोपी अरमान खान यास अटक करण्यात आली असून पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांचे पथक करीत आहे. यातील आरोपी हा गुटख्याची अवैधरित्या तस्करी करून कोणत्या ठिकाणांवर गुटख्याचा पुरवठा करणार होता, तसेच सदर गुटख्याचे पुरवठादार व खरेदीदार कोण आहेत याबाबत पोलीस पथक कसोशिने तपास करीत आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक श्री.आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे, पोहवा संदिप नागपुरे, मेघराज जाधव, प्रकाश कासार, नितीन डावखर, मनोज सानप, रवि गवळी यांनी सदरची कारवाई केली आहे.